# झाडी-गोडी

गोष्ट- केतकी घाटे
चित्र - भार्गवकुमार कुलकर्णी

दिनूकाका छोट्या मुलांच्या गँगला घेऊन टेकडीवर फिरायला निघाला. वाटेवरुन चालत असताना चिनू म्हणाला, "दिनूकाका ते बघ तिकडे समोरच्या डोंगरावर.. ते काय आहे केशरी भडक.. पताका आहेत की काय ?'' रितू म्हणाली, ''दिनूकाका आग लागली आहे का तिथे?''



सगळे जण तिकडे बघायला लागले. राधाकडे दुर्बीण होती. तिने ती डोळ्याला लावली. ''अरे, आग नाही.... झाड आहे ते!'' राधा म्हणाली. दिनूकाका म्हणाला, ''हो झाडच आहे ते. पळस नावाचं. त्याला इंग्रजीत **"Flame of the Forest"** म्हणतात. त्याच्या भगव्या–केशरी रंगाच्या फुलांमुळे जंगलाला आग लागली आहे असाच भास होतो. चला, आपण जवळ जाऊन बघू.'' सगळी मुलं धावत त्या झाडाच्या दिशेने निघाली.

तिथे पोचल्यावर फुलांनी गच्च भरलेलं झाड बघून मुलं खूश झाली. दिनूकाका म्हणाला, ''पळस हे पानगळी प्रकारचं झाड आहे. सगळी पानं गळून गेली की मग तांबूस-भगव्या रंगांच्या फुलांनी झाड असं भरभरून फुलतं.'' दिनूकाकाने खाली पडलेलं एक फूल उचललं आणि उलटं धरलं, ''फुलांचा आकार बघा. आहे की नाही पोपटाच्या चोचीसारखा?''

राधा एक फूल उलगडत म्हणाली, ''किती मऊ वेलव्हेटसारखी फुलं आहेत याची. आणि किती मुंग्या आहेत त्यात!'' ''हो .. हे किडे, मुंग्या, मधमाश्या, पक्षी सगळ्यांचं आवडतं झाड आहे. ते यातला मकरंद म्हणजे गोड रस खायला येतात. त्यांच्यासाठी हाच ब्रेकफास्ट!'' रियाताई म्हणाली, ''दिनूकाका.. पळसाला पाने तीन, असं म्हणतात ना?'' ''हो... हे बघ, त्याच्या पानांच्या रचनेवरून तशी म्हण तयार झाली.''

''दिनूकाका, तो बघ सनबर्ड त्या फांदीवर'', चिनू ओरडला. ''आणि त्या फांदीवर ड्रॉंगो'', जुई ओरडली. ''हो हो, शांत बसलात तर खूप सारे पक्षी बघायला मिळतील. चला आपण त्या समोरच्या झाडाखाली बसून किती पक्षी आहेत ते मोजू.'' सगळ्यांनी मिळून पक्ष्यांची यादी तयार केली आणि टेकडीवरच्या ट्रीपची सुंदर आठवण तयार झाली.



**पळसाचं लाल फुल**
**हिरवं पान गेलं झडी**
**इसरले लाल चोची**
**मिठू गेले कुठं उडी**
**- बहिणाबाई**

लाल फुलांनी बहरलेलं पळसाचं झाड बघून, पोपट आपल्या लाल चोची झाडावरच विसरून गेलेत असं बहिणाबाई म्हणतात. पळसाला संस्कृतमध्ये किंशुक म्हणतात.
किम् = काय?
शुक = पोपट.
हा 'पोपट की काय' याअर्थी.

### निसर्गविषयक बुद्धिमत्ता

निसर्गाच्या जवळ गेल्यावर रंग, वास, आवाज, स्पर्श अशा अनुभूती मुलांना सहजरित्या मिळतात. त्यातून उत्सुकता वाढते. यातून निसर्गाची काळजी घ्यायला मुलं आपोआप शिकतील. पहिलं पाऊल मात्र आपण उचलायला हवं

